# 'मिळून साऱ्याजणी' रंगवतात एकपात्री

**एकपात्री कलेत महिला मागे नाहीत. आपल्या कलेने आणि अभिनयाच्या शैलीमुळे त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. अर्थात, या क्षेत्रात त्यांच्यासाठी आव्हानेही कमी नाहीत. तरी त्यांनी स्वतःला सिद्ध करून दाखवले आहे. त्यातल्याच काहीजणींशी मारलेल्या या गप्पा.**



एकपात्री महिला कलाकार.

सुहासिनी मुळगावकर यांनी संगीत नाटकातून १९७०-८० च्या दशकात महिला कलाकारांसाठी एकपात्री नाटकांची कवाडे उघडून दिली. त्यानंतर सुमन धर्माधिकारी, भक्ती बर्वे, सुहासिनी देशपांडे आणि लालन सारंग यांनी आपल्या अदाकारीने एकपात्रीच्या क्षेत्रात महिलांसाठी भरभक्कम स्थान निर्माण केले. तोच यशस्वी प्रवास आजतागायत सुरू आहे, फक्त त्यातील पात्रे आता बदलली आहेत.

नव्या दमाच्या एकपात्री महिला कलाकारांमध्ये १५ वर्षे अनुभव असलेल्या मंजिरी धामणकर यांच्यापासून ते नव्या पिढीतील चैताली माजगावकर-भंडारी यांचे नाव घेता येईल. पुण्यातील या महिला कलाकारांनी आपल्या कौशल्याने एक स्वतंत्र स्थान निर्मिले आहे. भावना प्रसादे, लीना मामर्डे, मोनिका जोशी, मेघा गोखले, वृंदा बाळ, शांभवी बोधे, कल्पना देशपांडे, मंजूषा जोशी, रागिणी सोमण... अशी कितीतरी नावे घेता येतील.

धामणकर यांनी एकपात्री प्रयोग करतानाचे अनुभव सांगितले. त्या म्हणाल्या, "मी बावीस वर्षे निवेदक म्हणून काम केल्यानंतर या क्षेत्रात पाऊल ठेवले. महिलांसाठी या क्षेत्रात अनेक आव्हाने होती. पण ती पेलत मी शिखर गाठू शकले. संहिता उत्कृष्ट असेल तर आपले एकपात्री नाटक उत्कृष्ट ठरते. मीही सकारात्मक दृष्टिकोन घेऊन वाटचाल सुरू केली आणि वेगळेपणाही जपला." चैताली माजगावकर-भंडारी या क्षेत्रातील नव्या पिढीचा आरसा आहेत. त्यांनी बहुआयामी एकपात्री कार्यक्रमांनी रसिकांची मने जिंकली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, "एकपात्री प्रयोग करताना संहिता ही महत्त्वाची बाब असते. माझ्या प्रयोगांत सामाजिक विषयांबरोबरच करमणूकप्रधान विषयांवरही भर असतो. कुटुंबाची व मुलांची जबाबदारी सांभाळत हा प्रवास मी सुरू ठेवला आहे."

रागिणी सोमण या सामाजिक विषयांवर बोलक्या बाहुल्यांचा एकपात्री प्रयोग सादर करतात. त्या म्हणाल्या, "मी या प्रयोगांतून स्त्रीभ्रूण हत्येपासून ते बाललैंगिक शोषण असे विषय हाताळले आहेत. प्रेक्षकांना मनोरंजनाबरोबरच सामाजिक आशयाचे विषयही एकपात्रीमधून पाहायला आवडतात. त्यामुळे मी नेहमीच अशा विषयांवर भर देते." मेघा गोखले व मंजूषा जोशी म्हणाल्या, "कविता, विनोद किस्से, गप्पा-टप्पा अशा गोष्टींचा एकपात्री प्रयोगांमध्ये अंतर्भाव होतो. आम्ही स्वतःच संहिता तयार करतो आणि त्यावर नाटक बसवतो. सध्या एकपात्री प्रयोगांना चांगले दिवस आले आहेत. महिलांनाही आदराचे स्थान मिळत असल्याचा आनंद वाटतो."

"एकपात्री नाटक हे आमच्यासाठी वेगळेच विश्व आहे. एकाच व्यक्तीला अनेक पात्रे सादर करावी लागतात. त्यामुळे अनेक आव्हाने उभी असतात. पण यातूनही आम्ही मार्ग काढतो. फक्त या क्षेत्रात आजही महिलांना कमी लेखले जाते, ही वागणूक बदलावी हीच इच्छा आहे," असे वृंदा बाळ आणि शांभवी बोधे यांनी सांगितले. लीना मामर्डे आणि मोनिका जोशी म्हणाल्या, "आज सोशल मीडियामुळे मार्केटिंगची स्पर्धा निर्माण झाली आहे. सगळे मार्केटिंगच्या मागे धावताना दिसतात. पण मार्केटिंग कितपत योग्य आहे? आपण आपल्या कामातून वेळ काढून बोलले पाहिजे. अनुभव, पात्रता, संहिता व काम ही गोष्ट एकत्रित बांधली गेली तर प्रत्येक गोष्ट एका साच्यात बसते."

**सुवर्णा चव्हाण**